# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.12.2025** **वारःमंगळवार**

---

१ ) पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नीती आयोगाचे प्रमुख  अर्थतज्ञ आणि आर्थिक क्षेत्रातील अभ्यासकांशी चर्चा करणार

२ ) अरावली डोंगररांगांच्या नव्या व्याख्येला स्थगिती देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्णय

३)बांगलादेशच्या माजी पंतप्रधान बेगम खालिदा झिया यांच ढाका  इथ दीर्घ आजारान निधन

आणि

४) महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यात आज 20 षटकांचा पाचवा सामना

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नीती आयोगाचे प्रमुख  अर्थतज्ञ आणि आर्थिक क्षेत्रातील अभ्यासकांशी चर्चा करणार आहेत. यावेळी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन उपस्थित राहणार आहे. यावेळी देशाची वर्तमान आर्थिक स्थिति आणि भविष्यातील आर्थिक प्रगतीसाठी प्राथमिकता याविषयावर विस्तृत चर्चा होण्याची शक्यता आहे. तसच आगामी  केंद्रीय अर्थसंकल्पाच्या संदर्भात सुद्धा पंतप्रधान मोदी यावेळी अर्थशास्त्रज्ञांची मते जाणून घेणार आहेत.

**<u>अरावली पर्वत</u>**

अरावली डोंगररांगांच्या नव्या व्याख्येला स्थगिती देण्याचा निर्णय काल सर्वोच्च न्यायालयाने दिला. अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवरून पर्यावरण तज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांनी व्यक्त केलेल्या चिंतेची सर्वोच्च न्यायालयानं दखल घेतली. अरावली टेकड्यांच्या नव्या व्याख्येबाबत काही गोष्टी स्पष्ट करणं आवश्यक आहे, आधीच्या समितीच्या शिफारशींची पडताळणी करण्यासाठी एक समिती स्थापन केली जाईल, ज्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांचाही समावेश असेल असं न्यायालयानं सांगितलं. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती एजी मसीह आणि जे के महेश्वरी यांच्या पीठासमोर सुनावणी झाली.
अरावली पर्वत रांगांच्या संदर्भातल्या स्वतःच्या आदेशाला दिलेली स्थगिती आणि या बाबींच्या अभ्यासासाठी नवी  समिती नेमण्याच्या  सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचं  केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामानबदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी स्वागत केलं आहे.

**<u>शस्त्र खरेदी</u>**

संरक्षण खात्यासाठी विविध शस्त्र आणि यंत्रसामुग्री खरेदी करण्याच्या प्रस्तावाला संरक्षण अधिग्रहण मंडळाने स्वीकृती दिली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्ली इथं झालेल्या बैठकीत हा प्रस्ताव मंजूर झाला. तीनही सेनादलांसाठीच्या मिळून आवश्यक सामग्रीसाठी ७९ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यात लांब पल्ल्याचा प्रक्षेपक पीनाक साठीची स्फोटकं, कमी वजनाची रडार्स, ड्रोन शोधक यंत्रणा. उच्च तरंग लहरींवर चालणारे रेडियो संच, विमानांच्या उड्डाण आणि अवतरणाच्या वेळी लागणारी रेकॉर्डिंग यंत्रणा, अशा अत्याधुनिक उपकरणांचा आणि यंत्रसामुग्रीचा समावेश आहे.

**<u>पिनाका चाचणी</u>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओनं चांदीपूर इथं काल पिनाका या लांब पल्ल्याच्या अग्निबाणाची पहिली यशस्वी चाचणी घेतली. १२० किलोमीटरच्या कमाल पल्ल्यासाठी घेण्यात आलेल्या या चाचणीत या अग्निबाणानं अचूकतेने लक्ष्याचा वेध घेतला, असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. याची रचना आर्मामेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंटनं केली आहे.संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या कामगिरीबद्दल डीआरडीओचं अभिनंदन केलं आहे.या लांब पल्ल्याच्या अग्निबाणाची यशस्वी रचना आणि विकास सशस्त्र दलांच्या क्षमतांना चालना देईल, असं राजनाथसिंह यांनी म्हटलं आहे.

**<u>हेलिकॉप्टर</u>**

केंद्रीय विमान वाहतूक मंत्री के राम मोहन नायडू आज बंगळूरू इथं ध्रुव एनजी या स्वदेशी बनावटीच्या प्रगत कमी वजनाच्या हेलिकॉप्टरला हिरवा झेंडा दाखवतील. सहा ते १४ आसनक्षमता असणारं हे हेलिकॉप्टर हिंदुस्थान एरोनॉटिक्सनं एरो इंडिया शोमध्ये सादर केलं होतं. पर्यटन, महत्त्वाच्या व्यक्तींची ने-आण, आपत्कालीन स्थिती, पूर आदी स्थितीत लोकांची सुटका करण्यासाठी हे हेलिकॉप्टर उपयोगी ठरणार आहे.

**<u>भारतीय अर्थव्यवस्था</u>**

वर्ष २०४७-४८ पर्यंत भारत २६ लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था बनू शकतो, असं आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्था अर्न्स्ट अँड यंगनं आपल्या ताज्या अहवालात म्हटलं आहे. तोपर्यंत भारतातील दरडोई उत्पन्न अंदाजे १५,००० डॉलर्स असेल, जे सध्याच्या पातळीपेक्षा जवळजवळ सहा पट आहे.वर्ष २०३० पर्यंत, भारत, जर्मनी आणि जपानला मागे टाकून चीन आणि अमेरिकेनंतर जगातली तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनण्याची अपेक्षा आहे, असंही या अहवालात म्हटलं आहे. आर्थिक उदारीकरण धोरणांमुळे भारतानं जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनण्यात यश मिळवलं असून, येत्या काही दशकांमध्ये भारताचा विकास दर प्रमुख जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक राहील, असंही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**<u>ट्रंप भेट</u>**

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रंप आणि इस्त्राइलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानहू यांची काल फ्लोरिडा इथ ट्रंप यांच्या निवासस्थानी भेट झाली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये इस्त्राइल- हमास संघर्ष यासह विविध

विषयावर चर्चा झाली. यानंतर अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रंप यांनी पत्रकारांशी बोलताना हमासला इस्त्राइलशी चाललेला संघर्ष थांबवण्यासाठी  निर्वाणीचा कडक इशारा दिला. ट्रंप म्हणले की हमासला निशस्त्रीकरणासाठी अतिशय कमी वेळ  देण्यात आला असून या मुदतीत त्यांनी शस्त्रसंधी न केल्यास हमासला संपवण्यासाठी इस्त्राइलचे आंतरराष्ट्रीय समर्थक देश हस्तक्षेप करतील. त्यासाठी आम्हाला इस्त्राइलच्या प्रत्यक्ष मदतीचीही आवश्यकता लागणार नाही, असा इशारा डोनाल्ड ट्रंप यांनी यावेळी बोलताना दिला

**<u>रब्बी पेरणी</u>**

देशात ६१४ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झाली आहे,अशी माहिती नुकतीच केंद्रीय कृषी मंत्रालयानं दिली. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागानं रब्बी पिकांखालील क्षेत्राच्या प्रगतीचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार, गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील १२९ लाख हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत, यंदा १३३ लाख हेक्टर क्षेत्रावर कडधान्यांची पेरणी झाली आहे, तर गेल्या वर्षी नोव्हेंबरमधील ४८ लाख हेक्टरच्या तुलनेत, यंदा ४९.०६ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर ज्वारी आणि भरड धान्यांची पेरणी झाली आहे. तेलबियांच्या पेरणीखालील क्षेत्र ९४ लाख हेक्टरपेक्षा अधिक आहे.

**<u>Intro</u>**

**<u>जीरामजी</u>**

विकसित भारत जी राम जी कायद्याचं विविध स्तरतून स्वागत होत आहे, या कायद्यासंदर्भात धुळे जिल्ह्यातील ताजपुरी ग्रामपंचायतचे सरपंच हेमंत सनेर यांनी दिलेली ही प्रतिक्रिया....

**<u>निवडणूकसमग्र</u>**

महाराष्ट्रातल्या महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. उद्या या अर्जांची छाननी होईल. 2 जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. 3 जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप होईल आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. येत्या 15 जानेवारीला मतदान होणार असून 16 जानेवारीला मतमोजणी होईल.

उमेदवारी अर्ज दखल करण्याच्या अखेरच्या टप्प्यात राज्यभरात राजकीय घडामोडी गतिमान झाल्या आहेत. विविध राजकीय पक्षांनी युती-आघाडीबाबतचे निर्णय स्थानिक पातळीवर घेतले आहेत.

**<u>समीक्षा  बैठक</u>**

केंद्रीय जलशक्तीमंत्री सी आर पाटील यांनी काल नवी दिल्लीत राष्ट्रीय  भूजल मूल्यांकन २०२४च्या नियमांनुसार १२० पेक्षा अधिक भूजल संकटग्रस्त जिल्ह्यामधील जलपातळीची समीक्षा केली.  यात जमिनी स्तरावर लोकसहभागातून पाणी साठा वाढवण्याच्या दृष्टीने उपाययोजनांवर लक्ष्य केंद्रित करण्यात आल असून त्याचा आढावा यावेळी घेण्यात आला. पुढील वर्षी ३१ मे पर्यंत १ कोटी कृत्रिम जलाशय निर्मिती करण्याच उद्दिष्ट सरकारतर्फे ठेवण्यात आल आहे. या दृष्टीने विविध योजनांमधील समन्वयाच्या बाबतीत यावेळी मार्गदर्शन करण्यात आल.

**निधन**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान बेगम खालिदा झिया यांच  आज सकाळी ढाका  इथल्या खाजगी रुग्णालयात दीर्घ आजारान निधन झाल . त्या ८० वर्षांच्या होत्या . बांगलादेश नॅशनल पार्टीच्या वतीने समाजमध्यमावरील संदेशात हे वृत्त देण्यात आल आहे. बांगलादेशाच्या राजकीय क्षेत्रात खालिदा झिया यांच्या व्यक्तिमत्वाचा गेली अनेक दशके प्रभाव होता.  त्यांनी दोन वेळा बांगलादेशाचं  पंतप्रधानपद भूषवलं. बांगलादेश नॅशनल पार्टीच्या  त्या अनेक वर्षे अध्यक्ष होत्या

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातला 20 षटकांचा पाचवा आणि अंतिम सामना आज थिरूवनंतपुरम इथं खेळला जाणार आहे. सामना संध्याकाळी सात वाजता सुरू होईल. पाच सामन्यांच्या मालिकेतील चार सामने जिंकून भारतानं विजयी आघाडी घेतली आहे. आजचा सामना जिंकून या मालिकेत निर्भेळ यश मिळवण्यासाठी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

**रेल्वे सूचना**

उत्तर भारतात थंडी आणि दाट धुक्यामुळे रेल्वे वाहतूक विस्कळीत होऊ नये यासाठी रेल्वे मंत्रालयाने उत्तर रेल्वे विभाग तसच  उत्तर पूर्व आणि उत्तर मध्य रेल्वे विभागाला अनेक सूचना दिल्या आहेत . उत्तर भारतात धावणाऱ्या सर्व रेल्वेगाड्यांची सद्य स्थिति आणि गाड्यांमधील अल्पोपहार जेवणाची व्यवस्था याचा आढावा घेण्याच्या सूचना रेल्वेमंत्रालयाने या विभागांच्या महासंचालकांना दिल्या आहेत. तसच वंदेभारत आणि शताब्दी एक्सप्रेस या गाड्या वेळेवर धावतील यासाठी अतिरिक्त रेल्वे मार्गिका उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार**